<u>**नवी मुंबई महानगरपालिका**</u>

<u>**महापालिका सर्वसाधारण सभा**</u>

महानगरपालिकेच्या शनिवार, दिनांक 17 फेब्रुवारी 2018 रोजी भरलेल्या माहे डिसेंबर 2017 महिन्याच्या सर्वसाधारण तहकुब सभेत मंजूर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसुदा स्वरूपात खालीलप्रमाणे आहे.:-

| | |
|---|---|
| **विषय क्र. 40. दिनांक 20 डिसेंबर 2017.** | तुर्भे विभागातील सानपाडा येथील संभाजी चौक से. 08 ते वेस्टर्न कॉलेज से. 09 येथे रस्ता, पावसाळी ड्रेन व पदपथाची सुधारणा करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 08/12/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/ श.अ./1506/2017. |
| **ठराव क्र. 236. दिनांक 17 फेब्रुवारी 2018.** | "तुर्भे विभागातील सानपाडा येथील संभाजी चौक से. 08 ते वेस्टर्न कॉलेज से. 09 येथे रस्ता, पावसाळी ड्रेन व पदपथाची सुधारणा करणेच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 1 कोटी, 23 लाख, 40 हजार 235 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |
| **विषय क्र. 41. दिनांक 20 डिसेंबर 2017.** | वाशी सेक्टर 10ए भूखंड क्र. 11 टेनिस कोर्ट लगतच्या मैदानामध्ये आंतरक्रिडा इमारत (Indoor Sport Building) बांधण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 08/12/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/ श.अ./1507/2017. |
| **ठराव क्र. 237. दिनांक 17 फेब्रुवारी 2018.** | "वाशी सेक्टर 10ए भूखंड क्र. 11 टेनिस कोर्ट लगतच्या मैदानामध्ये आंतरक्रिडा इमारत (Indoor Sport Building) बांधण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 68 लाख, 30 हजार 903 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |
| **विषय क्र. 42. दिनांक 20 डिसेंबर 2017.** | बेलापूर विभागातील सी.बी.डी. से. 3 येथील बी-10/8 ते सी-6/8 निलकमल सोसायटी पर्यंतच्या गटाराची व पदपथाची सुधारणा करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 08/12/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/ श.अ./1508/2017. |
| **ठराव क्र. 238. दिनांक 17 फेब्रुवारी 2018.** | "बेलापूर विभागातील सी.बी.डी. से. 3 येथील बी-10/8 ते सी-6/8 निलकमल सोसायटी पर्यंतच्या गटाराची व पदपथाची सुधारणा करणेच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 49 लाख, 75 हजार 876 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |
| **विषय क्र. 43. दिनांक 20 डिसेंबर 2017.** | ऐरोली से. 3 येथील अग्निशमन केंद्राची जुनी सिडकोकालीन इमारत तोडून नवीन इमारत बांधण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 08/12/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/ श.अ./1509/2017. |
| **ठराव क्र. 239. दिनांक 17 फेब्रुवारी 2018.** | "ऐरोली से. 3 येथील अग्निशमन केंद्राची जुनी सिडकोकालीन इमारत तोडून नवीन इमारत बांधण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 16 कोटी, 99 लाख, 71 हजार 831 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. 44.**<br>**दिनांक 20 डिसेंबर 2017.** | कोपरखैरणे सेक्टर 15 येथील स्कायलार्क सोसायटी ते वसुंधरा डेअरी पर्यंत व रो हाऊस नं. 69 लगत हेवी डयुटी गटर बांधण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 08/12/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/ श.अ./1510/2017. |
| **ठराव क्र. 240.**<br>**दिनांक 17 फेब्रुवारी 2018.** | कोपरखैरणे सेक्टर 15 येथील स्कायलार्क सोसायटी ते वसुंधरा डेअरी पर्यंत व रो हाऊस नं. 69 लगत हेवी डयुटी गटर बांधण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 08/12/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/ श.अ./1510/2017. |
| **निर्णय** | **मंजूर.** |
| **विषय क्र. 45.**<br>**दिनांक 20 डिसेंबर 2017.** | तुर्भे टी.टी.सी. औदयोगिक क्षेत्रातील डी ब्लॉक मधील भु.क्र. डी-268 ते फायझर रोड व भु.क्र. डी-342 ते भु.क्र. डी-257 पर्यंत रस्ता व ड्रेनची सुधारणा करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 08/12/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/ श.अ./1511/2017. |
| **ठराव क्र. 241.**<br>**दिनांक 17 फेब्रुवारी 2018.** | "तुर्भे टी.टी.सी. औदयोगिक क्षेत्रातील डी ब्लॉक मधील भु.क्र. डी-268 ते फायझर रोड व भु.क्र. डी-342 ते भु.क्र. डी-257 पर्यंत रस्ता व ड्रेनची सुधारणा करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 1 कोटी, 50 लाख, 02 हजार 618 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |
| **विषय क्र. 46.**<br>**दिनांक 20 डिसेंबर 2017.** | घणसोली सेक्टर 7 येथील भुखंड क्रमांक 11 येथे शाळेची नवीन इमारतीचे बांधकाम करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 08/12/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/ श.अ./1512/2017. |
| **ठराव क्र. 242.**<br>**दिनांक 17 फेब्रुवारी 2018.** | "घणसोली सेक्टर 7 येथील भुखंड क्रमांक 11 येथे शाळेची नवीन इमारतीचे बांधकाम करणेच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, कामातील वाढीव रक्कम रू. 3 कोटी, 44 लाख, 1 हजार 347 यासह एकूण रक्कम रु. 13 कोटी, 34 लाख, 77 हजार 699 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, सुधारीत प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |
| **विषय क्र. 47.**<br>**दिनांक 20 डिसेंबर 2017.** | नवी मुंबई महानगरपालिकेस अतिक्रमण विभागासाठी पिकअप व्हॅन वाहन भाडयाने पुरविणेबाबतच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 08/12/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/ वाहन/382/2017. |
| **ठराव क्र. 243.**<br>**दिनांक 17 फेब्रुवारी 2018.** | "नवी मुंबई महानगरपालिकेस अतिक्रमण विभागासाठी पिकअप व्हॅन वाहन भाडयाने पुरविणेच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, अतिक्रमण विभागासाठी 04 पिकअप व्हॅन वाहने भाडेतत्वावर पुरविणेसाठी येणाऱ्या अंदाजित खर्च रक्कम रु. 32 लाख, 43 हजार 240 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |
| **विषय क्र. 48.**<br>**दिनांक 20 डिसेंबर 2017.** | नमुंमपा शिक्षण विभाग अंतर्गत बालवाडीच्या विदयार्थींना सकस आहार पुरवठा करणेकामी प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबतच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 08/12/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/शि.वि./2857/2017. |
| **ठराव क्र. 244.**<br>**दिनांक 17 फेब्रुवारी 2018.** | "नमुंमपा शिक्षण विभाग अंतर्गत बालवाडीच्या विदयार्थींना सकस आहार पुरवठा करणेकामी प्रशासकीय मंजुरी मिळणेच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, 02 वर्षासाठी विद्यार्थी पुरक पोषण आहार व सकस आहार या लेखाशिर्षाअंतर्गत अंदाजित रक्कम रु. 3 कोटी, 19 लाख, 04 हजार 611 मात्र इतक्या खर्चास व ऑन लाईन निविदा मागविण्यास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. 49. दिनांक 20 डिसेंबर 2017.** | तुर्भे सेक्टर-19ए व 19एफ मध्ये विविध ठिकाणी ड्रेन व पदपथाची सुधारणा करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 11/12/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./1521/2017. |
| **ठराव क्र. 245. दिनांक 17 फेब्रुवारी 2018.** | "तुर्भे सेक्टर-19ए व 19एफ मध्ये विविध ठिकाणी ड्रेन व पदपथाची सुधारणा करणेच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रु. 1 कोटी, 37 लाख, 69 हजार 100 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |

**<u>महानगरपालिकेने मंजूर केलेल्या आणि उचित कार्यवाहीसाठी पाठविलेल्या ठरावांची यादी</u>**

**माहे 20 डिसेंबर 2017 ची सर्वसाधारण सभा**

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 1. | **श्रीम. कमल धनाजी पाटील, यांजकडून :-** घणसोली भुखंड क्र. 6 से.7, येथील भूखंड रुग्णालयाचा असुन सदर भुखंड सिडको कडुन महानगरपालिकेस हस्तांतर झाला आहे. सदय परिस्थितीत घणसोली नोड मध्ये महानगरपालिकेचे एकही रुग्णालय नसल्यामुळे येतील अति अल्प उत्पन्न गटातील लोकांना याचा त्रास सहन करावा लागत आहे, आणि उपचारासाठी वाशी, ऐरोली अशा ठिकाणी महानगरपालिकेच्या रुग्णालयात जावे लागत आहे. गेली 15 वर्ष महापालिकेस कर भरणाकरुन सुध्दा कुठल्याही आरोग्य विषयक सुविधा नागरिकांना प्राप्त झाल्या नाहीत. त्याकरिता सदर ठिकाणी रुग्णालय बांधणे. | 50<br>डिसेंबर | 246<br>17/02/2018 | मंजूर |
| 2. | **श्रीम. कमल धनाजी पाटील, यांजकडून :-** घणसोली भुखंड क्र. 10, से. 7 येथील भुखंड हा समाज मंदिराचा असुन सदर भूखंड हा सिडकोकडून महानगरपालिकेस हस्तांतर झालेला आहे. सदय स्थितीत घणसोली नोड मध्ये एकही समाज मंदिर नाही, सदर भुखंडावर समाज मंदिर बांधण्यात यावे जेणेकरुन त्याचा वापर घणसोलीतील अतिअल्प उत्पन्न गटातील लोक करु शकतील तसेच सदर समाज मंदिराकरिता शासनाकडुन येणा-या निधीची वाट न बघता महानगरपालिकेने निधीची तरतूद करणे. | 51<br>डिसेंबर | 247<br>17/02/2018 | मंजूर |
| 3. | **श्री. विशाल राजन डोळस, यांजकडून :-** प्रभाग क्र. 108 मधील सेक्टर 48 येथील गायत्री सोसायटी ते विठ्ठल रुक्मीणी मंदीर पर्यंत रस्ता दुरुस्ती करणे. | 58<br>डिसेंबर | 248<br>17/02/2018 | मंजूर |
| 4. | **श्रीम. मीरा संजय पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्र. 90, नेरुळ येथे सेक्टर 09 आर्मी कॉलनी लगत तुलसी उदयानामध्ये खाली वर अशी दोन मैदाने आहेत. येथे संपुर्ण नेरुळ विभागातील मुले खेळण्यासाठी येतात ही दोन्ही मैदाने एकत्र करुन सुसज्ज स्टेडिअम बनविले तर येथे चांगली सुविधा उपलब्ध होईल. जसे सी.बी.डी. मध्ये स्व. राजीव गांधी मिनी स्टेडीअम बांधलेले आहे तशा प्रकारचे मिनी स्टेडीअम याठिकाणी बांधणे. | 59<br>डिसेंबर | 249<br>17/02/2018 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 5. | **श्री. अशोक बाबुराव गुरखे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 102, सी.बी.डी., सेक्टर 9 येथील ग्रीन वॅली (नर्सरी) येथे दिवाबत्तीची सोय करणे. | 66<br>डिसेंबर | 250<br>17/02/2018 | मंजूर |
| 6. | **श्री. अशोक बाबुराव गुरखे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 102, सी.बी.डी., सेक्टर 1अे येथील सायन-पनवेल हायवेलगत व मँगो गार्डनच्या समोर असलेल्या फूटपाथ कमी करून तेथे पार्किंगची व्यवस्था करणे. | 67<br>डिसेंबर | 251<br>17/02/2018 | मंजूर |
| 7. | **श्री. अशोक बाबुराव गुरखे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 102, सी.बी.डी., सेक्टर 9 येथील लेन नं. 5 ते लेन नं.8 च्या समोर असलेल्या गटारांवर तारेची कुंपन घालणे. | 68<br>डिसेंबर | 252<br>17/02/2018 | मंजूर |
| 8. | **श्रीम. ऋचा रामचंद्र पाटील यांजकडून :-**<br>हुतात्मा बाबू गेनू मैदान भूखंड क्र. 1, सेक्टर 8, सानपाडा दिनांक 30/11/2017 रोजी उदयान प्रयोजनासाठी हस्तांतरित करण्यात आला आहे.(आपल्या माहितीनुसार) परंतु गेल्या 15 वर्षापासून त्याचा वापर मैदान म्हणूनच होत आहे व त्याचे नामकरणही आपण "हुतात्मा बाबू गेनू मैदान" असे करण्यात आले आहे. तसेच गेल्या 15 वर्षापासून सर्व सांस्कृतीक काय्रक्रम याच मैदानात पार पाडले जात आहेत येणा-या विकास आराखडयामध्ये (DP PLAN) याचे आरक्षण मैदान असे करण्यात यावे व तेथे व तेथे उदयान विकसित करु नये. बाबू गेनू मैदानापासून 100 मीटर अंतरावर "सीताराम मास्तर उदयान" व "संत शिरोमणी उदयान" असताना भूखंड क्र. 1 चा वापर जनतेसाठी मैदान म्हणूनच वापर करणे. | 73<br>डिसेंबर | 253<br>17/02/2018 | मंजूर |
| 9. | **श्रीम. ऋचा रामचंद्र पाटील यांजकडून :-**<br>हुतात्मा बाबू गेनू मैदानात हुतात्मा बाबू गेनू यांचे स्मारक उभारणे. | 74<br>डिसेंबर | 254<br>17/02/2018 | मंजूर |
| 10 | **श्री. नामदेव रामा भगत, यांजकडून :-**<br>नवी मुबई वासीयांचा अवाजवी मालमत्ता कर कमी करावा यावास्तव मी सातत्याने आवाज उठविला आहे. त्याच बरोबर मी व माझ्या सहका-यांनी सलग एकोणिस दिवस उपोषणही केलेले आहे. त्यानंतर काही अंशी मालमत्ता कर कमी करण्यात आला होता. परंतु आजही तो सर्व सामान्यांच्या आवाक्याबाहेरचाच आहे. आज विविध सेवासुविधांवर समाधानकारक खर्च करुनही नवी मुंबई महानगरपालिकेकडे रुपये दोन हजार कोटी शिल्लक राहिलेले असून ते फिक्स डिपॉझिट म्हणून बँकेत जमा आहेत. यावरुन नवी मुंबई महानगरपालिका आकारत असलेला कर किती अवाजवी आहे, याची प्रचिती येते. म्हणूनच याची भरपाई म्हणून पालिकेने नवी मुंबई वासीयांचा 2018-19 चा मालमत्ता कर पूर्णत: माफ करावा हि विनंती. त्याची अंमलबजावणी करुन नवीन अंदाजपत्रात तशी नोंद करणे. | 75<br>डिसेंबर | 255<br>17/02/2018 | मंजूर |
| 11 | **श्री. हरिचंद्र आत्माराम भोईर, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 59, जुहूगांव, से.11 वाशी नवी मुंबई येथील जलकूंभाच्या बाजूला असलेले नागरी आरोग्य केंद्राची इमारत मोडकलीस आली आहे. सदर इमारत तोडून तेथे लग्नकार्यासाठी व इतर विधीकार्यायासाठी बहुउद्देशीय इमारत उभारणे. | 84<br>डिसेंबर | 256<br>17/02/2018 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 12 | **श्री. हरिचंद्र आत्माराम भोईर, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 59, जुहूगांव, से.11 वाशी नवी मुंबई येथील वेलकम बुक स्टोअर्स ते कै. राधा सुदाम भोईर निवास बिल्डींग येथील मलनि:स्सारण वाहिणी दररोज ओव्हरफूल होऊन सांडपाणी बाहेर येते. सदर ठिकाणच्या कमी व्यासाच्या मलनि:स्सारण वाहिनी बदलून तेथे मोठ्या व्यासाच्या मलनि:स्सारण वाहिनी टाकणे व तेथील फुटपाथची सुधारणा करणे. | 85<br>डिसेंबर | 257<br>17/02/2018 | मंजूर |
| 13 | **श्री. शशिकांत हंबीरराव राऊत, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 54, मधील वाशी सेक्टर 28 व 29 मधील नागरी वस्तीतून वाहणाऱ्या नाल्यालगतच्या दोन्ही रस्त्यावरती ए.पी.एम.सी. मार्केटला जाणाऱ्या व्यापारी व कामगारांच्या तसेच स्थानिक रहिवासी, स्कूल बस यांच्या वाहनांची सकाळी 5.00 ते रात्री 10.00 वाजेपर्यंत मोठ्या प्रमाणात ये-जा चालू असते. रहदारीमुळे गेल्या दहा वर्षापासून पावसाळ्यामध्ये इतरही वेळीला रस्त्यावरती वारंवार खड्डे पडल्याने नागरिकांना वाहने चालवण्यास मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्यावरील खड्ड्यामुळे वाहतूकीची कोंडी व छोटे मोठे अपघात सतत घडत असतात. यासाठी रस्त्याची नव्याने सिमेंट कॉंक्रीटमध्ये बांधणी करणे गरजेचे आहे. तरी सदर बाबींचा गांभिर्याने विचार करून योग्य ती कार्यवाही करणे. | 86<br>डिसेंबर | 258<br>17/02/2018 | मंजूर |
| 14 | **श्री. शशिकांत हंबीरराव राऊत, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 54, वाशी सेक्टर 29 मधील शरयु गृहनिर्माण सोसायटी ते पंचज्योत गृहनिर्माण सोसायटी समोरील फुटपाथ बारा वर्षापासून नादुरूस्त असल्यामुळे पावसाळ्यात पाणी वाहून नेणाऱ्या वाहिन्या बंद अवस्थेत असल्याने पावसाळी पाणी वाहून जाण्यास अडथळा निर्माण झाल्याने रस्त्यावरती मोठ्या प्रमाणात पाणी साचून रहाते. त्यामुळे रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या नागरिकांना, शाळकरी मुलांना, लहान मुलांना, वृद्धांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. तरी सदर बाबत योग्य कार्यवाही करणे. | 87<br>डिसेंबर | 259<br>17/02/2018 | मंजूर |
| 15 | **श्री. शशिकांत हंबीरराव राऊत, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 54, वाशी सेक्टर 29 मध्ये नवी मुंबई महानगरपालिकेने विकसित केलेले अतिशय सुंदर असे राजीव गांधी उद्यान असून सकाळपासून संध्याकाळपर्यत उद्यानाचा आनंद घेण्यासाठी हजारोंच्या संख्येने लहान मोठे अबाल वृध्द या परिसरातील व नवी मुंबईच्या आजूबाजूच्या परिसरातील नागरिक येत असतात. सदर मैदानाच्या उत्तर बाजूला लहान मुलांची विविध प्रकारची खेळण्याची साधने बसविलेली आहेत. मैदानाची जागा टणक असल्यामुळे लहान मुले खेळताना लहान मोठे अपघात होऊन ईजा होत असतात. हे अपघात टाळण्यासाठी खेळाच्या परिसरामध्ये आताच नवी मुंबई सेक्टर 26, कोपरी गांव येथील अम्युझमेंट पार्कमध्ये लहान मुलांच्या खेळण्याच्या परिसरात अतिशय सुंदर रबर मॅट टाकण्यात आलेली आहे. त्याच प्रकारचे रबर मॅट राजीव गांधी उद्यानातील लहान मुलांच्या खेळाच्या परिसरात टाकण्यात यावे. जेणे करून लहान मुलांना खेळताना ईजा पोहोचणार नाही. तरी सदर बाबत योग्य ती कार्यवाही करणे. | 88<br>डिसेंबर | 260<br>17/02/2018 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 16 | **श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-**<br>ऐरोली सेक्टर-15 येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाचे आवारातील दर्शनी भागात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्धकृती पुतळा बसविणे. | 89<br>डिसेंबर | 261<br>17/02/2018 | मंजूर |
| 17 | **श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 12, सेक्टर 2 या भागातील ज्ञानदिप शाळा ते गजानन महाराज मंदिरपर्यंत नवीन ड्रेनेज लाइन टाकणे अत्यंत गरजेचे आहे. सदरचे काम नागरिकांच्या समस्या विचारात घेऊन तातडीने पूर्ण करणे. | 90<br>डिसेंबर | 262<br>17/02/2018 | मंजूर |
| 18 | **श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 12, सेक्टर 2 येथील न.मुं.म.पा. या भूखंड क्र. 41/2B प्राथमिक आरोग्य केंद्र व वाचनालय न करता संपूर्ण इमारत स्पर्धा परिक्षा अभ्यासिका केंद्रासाठी देणे. | 91<br>डिसेंबर | 263<br>17/02/2018 | मंजूर |
| 19 | **श्रीम. सुनिता रतन मांडवे यांजकडून :-**<br>नेरूळ विभागात पूर्व पश्चिम दिशेला जाण्या येण्यासाठी सिडकोने बांधलेला भाररत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पादचारी पूल हा फारच अरूंद असून वाढलेल्या लोकसंख्येमुळे त्यावरून मार्गक्रमण करण्यास नागरिकांना गैरसोईचे ठरत आहे. ही गोष्ट विचारात घेऊन नेरूळ पूर्व पश्चिम दिशेला जोडण्यासाठी योग्य आकारमानाचे व आबाल वृध्दांना पुलावर चढ उतर करण्यास येण्यास सोईचे ठरावे अशा अद्यावत लिफ्टची अथवा सरकत्या जिन्यांची तरतूद असलेल्या स्काय वॉक पुलाची उभारणी करणे. | 98<br>डिसेंबर | 264<br>17/02/2018 | मंजूर |
| 20 | **श्रीम. सुनिता रतन मांडवे यांजकडून :-**<br>मनपाने बोनकोड व रबाळे या ठिकाणच्या पादचारी पुलांवर ज्याप्रमाणे लिफ्टची तरतूद केलेली आहे. त्याचप्रमाणे मनपाने व सिडको किंवा अन्य प्राधिकरणांनी उभारलेल्या शहरातील सर्व पादचारी पुलांवर अद्यावत लिफ्टची अथवा सरकत्या जिन्यांची तरतूद करणे. | 99<br>डिसेंबर | 265<br>17/02/2018 | मंजूर |
| 21 | **श्रीम. सुनिता रतन मांडवे यांजकडून :-**<br>मनपाच्या माता बाल रूग्णालयांमध्ये प्रसुती नोंदणी केलेल्या महिलांना मनपाकडे सोई सुविधा नसल्याने खाजगी तसेच संस्थांच्या रूगणालयांमध्ये उपचारासाठी पाठविण्यात येत असल्याने सर्वसामान्य गरीब जनतेला औषधे बाहेरून खरेदी करावे लागतात. तरी ज्या प्रकरणांमध्ये सर्वसामान्य करदात्या गरीब जनतेला खाजगी तसेच संस्थांच्या रूग्णालयांमध्ये उपचारासाठी पाठविण्यात येते अशा प्रकरणांमध्ये लागणाऱ्या औषधांची व साहित्याची तरतूद हिब मनपाच्या माध्यमातून करणे. | 100<br>डिसेंबर | 266<br>17/02/2018 | मंजूर |
| 22 | **श्रीम. संगिता संदिप म्हात्रे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 45 मधील जुन्या जलवाहिन्या बदलून नवीन जलवाहिन्या टाकणे. | 109<br>डिसेंबर | 267<br>17/02/2018 | मंजूर |
| 23 | **श्रीम. संगिता संदिप म्हात्रे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 45 मधील से. 3 येथे एल.ई.डी. लाईट्स बसविणे. | 110<br>डिसेंबर | 268<br>17/02/2018 | मंजूर |
| 24 | **श्रीम. संगिता संदिप म्हात्रे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 45 मधील सर्व रस्त्यांचे डांबरीकरण करणे | 111<br>डिसेंबर | 269<br>17/02/2018 | मंजूर |

| | |
|---|---|
| **विषय क्र. 115. दिनांक 20 डिसेंबर 2017.** | नवी मुंबई महापालिका क्षेत्रात ॲम्फीबीअस बस प्रकल्प सुरू करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 07/12/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/मालमत्ता/2559/2017. |
| **ठराव क्र. 270. दिनांक 17 फेब्रुवारी 2018.** | "नवी मुंबई महापालिका क्षेत्रात ॲम्फीबीअस बस प्रकल्प सुरू करणेबाबतच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, नवी मुंबई महानगरपालिका व जवाहरलाल नेहरू पत्तन न्यास यांच्या संयुक्त प्रकल्पा अंतर्गत ज्वेल ऑफ नवी मुंबई, सेक्टर-26, नेरूळ येथे ॲम्फीबीअस बस प्रकल्प सुरू करण्यास, **तसेच ॲम्फीबीअस बसचे परिचलनाचा विस्तार करुन सागर विहार वाशी पर्यंत करणे आणि सागर विहार वाशी ते ऐरोली या दुसऱ्या मार्गाचे परिक्षण व सर्व्हेक्षण करावे आणि त्यानंतर मुळ प्रस्तावाचा विचार करणेस,** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 79 अन्वये, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |
| **तां.का.क्र. 30. दिनांक 20 डिसेंबर 2017.** | नवी मुंबई महानगरपालिकेसाठी महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ(MSSC) या शासकिय संस्थेमार्फत सुरक्षा रक्षक उपलब्ध करुन घेणेबाबतच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 11/12/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/ आ. व्य/471/2017. |
| **ठराव क्र. 271. दिनांक 17 फेब्रुवारी 2018.** | "नवी मुंबई महानगरपालिकेसाठी महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ (MSSC) या शासकिय संस्थेमार्फत सुरक्षा रक्षक उपलब्ध करुन घेण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, नवी मुंबई महानगरपालिका-मुख्यालय, मा.महापौर निवासस्थान व मा. आयुक्त निवासस्थान या 03 ठिकाणी माहे डिसेंबर-2017 ते माहे नोव्हेंबर-2018 पर्यंत या 1 वर्षाच्या कालावधीकरीता महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांचेकडील सुरक्षा रक्षकांची नेमणूक करणेकरिता व त्यासाठी लागणाऱ्या एकूण अंदाजित रक्कम रू. 2 कोटी, 73 लाख, 33 हजार 600 मात्र इतक्या खर्चास, याकरिता संबंधित विभागाचे अंदाजपत्रकातील प्रशासकीय खर्चांतर्गत कंत्राटी सुरक्षा रक्षक खर्च या लेखाशिर्षकातील तरतुदीतुन प्रस्तावित अंदाजित खर्च करण्याकरीता व यापुढे ही सुरक्षा व्यवस्था पुढील कालावधीसाठी चालु ठेवणेस मान्यता देणेचे व यावर खर्च करणेचे अधिकार मा.आयुक्त, नमुंमपा यांना प्रदान करणेस, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |
| **तां.का.क्र. 31. दिनांक 20 डिसेंबर 2017.** | क्रिडा व सांस्कृतीक सिमिती अंतर्गत विविध स्पर्धा/कार्यक्रम/उपक्रम राबविणेबाबतच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 13/12/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/क्रिडा व संस्कृ/821/ 2017. |
| **ठराव क्र. 272. दिनांक 17 फेब्रुवारी 2018.** | "क्रीडा व सांस्कृतीक समिती अंतर्गत विविध स्पर्धा/कार्यक्रम/उपक्रम राबविणेच्या, प्रस्तावामधील तक्त्यांतील अ.क्र. 1 ते 21 कार्यक्रम/उपक्रम प्रत्येक वर्षी सदरहू क्रीडा स्पर्धा/उपक्रम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 66(9),(11) नुसार राबविण्यास, व त्या वर्षातील आर्थिक तरतूदीनुसार खर्च भागविणेस, **विविध स्पर्धा / कार्यक्रम / उपक्रम यामध्ये नवी मुंबई फेस्टिव्हलचा समावेश करण्यास,** प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |
| **तां.का.क्र. 32. दिनांक 20 डिसेंबर 2017.** | महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 मधील कलम 52क नुसार अनधिकृत बांधकामे प्रशमन आकार लावुन प्रशमित संरचना म्हणुन घोषित करण्यासाठी अधिनियमांचे कलम 158(1) अन्वये केलेले नियम प्रसिध्द करणेबाबत प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 14/12/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/नरवि/ससंनर/5175/2017. |
| **ठराव क्र. 273. दिनांक 17 फेब्रुवारी** | "महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 मधील कलम 52क नुसार अनधिकृत बांधकामे प्रशमन आकार लावुन "प्रशमित संरचना" म्हणुन घोषित |

| | |
|---|---|
| **2018.** | करण्यासाठी अधिनियमांचे कलम 158(1) अन्वये केलेले नियम प्रसिध्द करणेच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, शासनाचे दिनांक 07/10/2017 रोजीची अधिसूचनेची संपूर्ण वैधानिक कार्यवाही करणेस आणि सदरच्या अधिसूचना प्रमाणेचा मसुदा प्रसिध्द करून प्रसिध्द दिनांकापासून 60 दिवसाचे मुदतीत नागरिकास अर्ज देण्याच्या मुदतीबाबतच्या प्रस्तावास, **या ऐवजी सदरची अधिसूचना प्रसिध्द दिनांकापासून दिनांक 31 ऑक्टोबर 2018 पर्यंतच्या मुदतीत नागरिकास अर्ज देण्याच्या मुदतवाढीस,** सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |
| **तां.का.क्र. 33.<br>दिनांक 20 डिसेंबर 2017.** | महापालिका क्षेत्रातील सार्वजनिक/सामुदायिक शौचालयांच्या (CT/PT) भिंतीवर जाहिरात करणेबाबतचे हक्क देण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 16/12/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/परवाना विभाग/5257/2017. |
| **ठराव क्र. 274.<br>दिनांक 17 फेब्रुवारी 2018.** | "महापालिका क्षेत्रातील सार्वजनिक/सामुदायिक शौचालयांच्या (CT/PT) भिंतीवर जाहिरात करणेबाबतचे हक्क देण्याच्या, प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील एकूण 503 सार्वजनिक/सामुदायिक शौचालयांच्या (CT/PT) भिंतींवर 05 वर्षांच्या कालावधीकरिता जाहिरात करणेबाबतचे हक्क जाहिरात संस्थांना देणेबाबतच्या धोरणात्मक प्रस्तावास, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 79 (क) नुसार, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |
| **तां.का.क्र. 34.<br>दिनांक 20 डिसेंबर 2017.** | नमुमपा क्षेत्रातील सी.सी.टी.व्ही. यंत्रणेची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे व त्याकरिता लागणारी लिझलाईन भाडेतत्वावर घेणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 18/12/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./1581/2017. |
| **ठराव क्र. 275.<br>दिनांक 17 फेब्रुवारी 2018.** | "नमुंमपा क्षेत्रातील सी.सी.टी.व्ही. यंत्रणेची वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे व त्याकरिता लागणारी लिझलाईन भाडेतत्वावर घेणेच्या, प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, सी.सी.टी.व्ही. यंत्राणाचे पुढील दोन वर्षाकरिता वार्षिक देखभाल व दुरूस्ती व लिझलाईन भाडेतत्वावर घेण्याकरिता सदर काम चालू निविदेचे ठेकेदार मे. निर्मल डेटाकॉम प्रा.लि. यांचेकडून निविदेत प्राप्त झालेल्या मंजूर दराने काम करून घेण्यास एकूण रक्कम रु. 7 कोटी, 9 लाख, 98 हजार 396 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |
| **तां.का.क्र. 35.<br>दिनांक 20 डिसेंबर 2017.** | बालवाडी शिक्षका, मदतनीस, माध्यमिक शिक्षक यांच्या मानधनात वाढ करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 18/12/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/शिक्षण./2962/2017. |
| **ठराव क्र. 276.<br>दिनांक 17 फेब्रुवारी 2018.** | "बालवाडी शिक्षिका, मदतनीस, माध्यमिक शिक्षक यांच्या मानधनात वाढ करणेबाबतच्या, प्रस्तावातील शिक्षण विभागात तात्पुरत्या स्वरूपात कार्यरत बालवाडी शिक्षिका, मदतनीस, माध्यमिक शिक्षक व एकत्रित मानधनावरील माध्यमिक शिक्षण सेवक व प्राथमिक शिक्षक यांचे एकत्रित मानधनात माहे जून 2017 पासून **मा.सर्वसाधारण सभेच्या शिफारसीनुसार खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे वाढ करण्यास,** प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |

| अ. क्र. | संवर्ग | सदयस्थितीत कार्यरत कर्मचारी संख्या | सदयस्थितीत मासिक मानधन रू.(प्रती कर्मचारी) | प्रस्तावित मासिक मानधन रू.(प्रती कर्मचारी) | **मा.सर्वसाधारण सभेने केलेली शिफारस** |
|---|---|---|---|---|---|
| 1 | बालवाडी | 116 | 8000 | 12000 | **15000** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | शिक्षिका | | | | |
| | 2 | मदतनीस | 111 | 5000 | 8000 | <u>12000</u> |
| | 3 | माध्यमिक शिक्षक | 32 | 13000 | 20000 | <u>25000</u> |
| | 4 | माध्यमिक शिक्षण सेवक | 31 | 8000 | 20000 | <u>25000</u> |
| | 5 | प्राथमिक शिक्षक | | | | <u>20000</u> |
| **निर्णय** | **मंजूर.** | | | | | |

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महापालिका सचिव**
**नवी मुंबई महानगरपालिका**